ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# सयाजीराव महाराजांची धार्मिक सुधारणा योगदान आणि त्याची समकालीन प्रासंगिकता

**प्रा. पाटील अनिल निंबा**

*कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सटाणा,*
*ता. बागलाण जि. नाशिक*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

सयाजीराव गायकवाड हे सामाजिक आणि सुधारणा चे जनक होते. ब्रिटिशांच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक राजकीय आणि आर्थिक विकासाला वेग आला. ब्रिटिशांनी निर्माण केलेली राजकीय व्यवस्था ही केवळ त्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या नफ्यासाठी होते. ही वास्तव भारतातील सामाजिक आणि आर्थिक सुधारणा करणाऱ्या तत्वतः मान्य होते. पण बिटिश वसाहतवादाच्या परंपरेतून एक अशी वैचारिक भूमिका घेणारे परंपरा निर्माण झाली की भारतातील हजारो वर्ष ज्या चालीरीती आहेत व रूढी आणि परंपरा आहेत. त्याबाबत अभिमानाची आणि कौतुकास्पद म्हणून विकसित करण्यात प्रयत्न केला जात होता. या वैचारिक भूमिकेमुळे परंपरेबद्दल कोणत्याही प्रकारची चिकित्सक भावना अस्तित्वात नव्हती. दुसऱ्या बाजूला पारंपारिक धर्माबद्दल चिकित्सक बघण्याचा दृष्टीकोण आणि ब्रिटिशांच्या धोरणाबद्दल ची साशंकता निर्माण करून समाजात सामाजिक सुधारणांचा दृष्टीकोण निर्माण करून सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणारे सामाजिक आणि राजकीय सुधारक निर्माण झाले होते. महाराज सयाजीराव गायकवाड हे दुसऱ्या परंपरेतील होते. पण सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक आणि राजकीय सुधारणा बाबतचा दृष्टीकोन हा अधिक व्यापक व वैचारिक आणि तात्विक दृष्ट्या अतिशय प्रगल्भ होती.

## 1. सयाजीराव गायकवाड यांचे धार्मिक विचार

महाराज सयाजीराव गायकवाड धार्मिक विचारांच्या क्षेत्रामध्ये एक अभ्यासपूर्ण व्यक्तिमत्व होते. युरोपातील आणि विविध धर्माच्या आणि धार्मिक मूल्याचा अभ्यास त्यांनी केलेला होता. युरोपातील प्रबोधन चळवळीचा आणि धार्मिक क्षेत्रातील विविध बदलांचा संतुलित आढावा त्यांनी घेतलेला होता. महाराज सयाजीराव

गायकवाड यांनी बडोदा संस्थानचे राज्यकारभार हाती घेतल्यानंतर जगभरातील विविध देशातील धर्माचा आणि प्रबोधन चळवळीचा परिणाम त्या देशातील जनमानसामध्ये आणि जनमाणसाच्या विकासामध्ये कोणत्या प्रकारची भूमिका पार पाडली आहे हे त्यांनी जवळून अभ्यास केलेला होता. निष्कर्ष अंती महाराजांनी भारतातील प्रबोधन चळवळीचा धार्मिक क्षेत्रातील सुधारणा कशा प्रकारे घडवून आणता येईल त्यासाठी नेहमी ते सैद्धांतिक आणि व्यावहारिक पातळीवर विचार करत असत. भारतातल्या धर्माचे स्वरूप हे अत्यंत हिंसक आणि शोषणाला पूरक असल्याचे त्यांनी नमूद केले होते. जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था यासारख्या शोषणाच्या संस्था यांचे पाठबळ आणि आणि वैचारिक पुरवठा भारतातल्या धर्मसंस्थेने केल्याचा त्यांनी पुराव्यासहित स्पष्ट केले होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या धार्मिक क्षेत्रातील वैचारिक योगदान आणि बडोदा संस्थानातील सुधारणांचे स्वरूप समजून घ्यावे लागेल ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

सयाजीराव गायकवाड यांनी धार्मिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. या सुधारणा एका बाजूला महाराज नीतिशास्त्र आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक होते. दुसऱ्या बाजूला पाश्चिमात्य शिक्षण यांचा प्रभाव सुद्धा महाराजांच्या जीवनावर होता. महाराजांना भारतीय समाज जीवनातले धार्मिक अंतर्विरोध खूप चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी प्रयत्न केला. भारतीय समाजा धर्माच्या तत्वाखाली जखडलेला आहे. धर्मामुळे तो मानवी जीवनाचा असे गमावून बसल्या ची खंत सुद्धा महाराजांनी वेळोवेळी नोंदवलेली होती. धार्मिक क्षेत्रांमध्ये सुधारणा करणे हे सर्व सुधारण्याच्या पूर्व असल्याचा निष्कर्ष महाराजांनी काढलेला होता. बडोदा संस्थानातील किंबहुना भारतीय समाज जीवनात धर्माने दलित बहुजन समाजाला आणि स्त्रियांना अतिशय कठोर पद्धतीने जखडले गेले आहे. धर्माच्या नियमाच्या आधारे त्यांचे जीवन नियंत्रित करण्यात आलेले आहे. धर्मामुळे माणूस किती मागास असू शकतो याची पुरेपूर कल्पना त्यांना आलेली होती.

**2. धर्माचा मानवतावादी विचार**

सयाजीराव गायकवाड यांनी धर्माच्या विश्लेषणाची पद्धत आणि आणि अन्वयार्थ याचा मानवतावादी अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला होता. धर्माची निर्मिती ही केवळ शोषणासाठी केलेली आहे, यापुरता मर्यादित अर्थ महाराजांना अपेक्षित नव्हता. महाराजांनी धर्म ही संस्था मानवी जीवनाचा अत्यंत अविभाज्य भाग आहे. धर्माची निर्मितीच मुळात मानवी जीवनाच्या विविध कक्षा आणि क्षमता विकसित करण्यासाठी झाली आहे. म्हणून महाराज म्हणतात की" धर्म ही संस्था इतर कोणत्याही चांगल्या संस्थेप्रमाणे मनुष्याच्या विविध शक्तीचा पूर्ण विकास करण्याचा एकमेव हेतूने अवतरलेली आहे हे लक्षात ठेवावे लागेल" यावरून लक्षात येते की धर्माच्या निर्मितीचा असे हा मानवी कल्याणाचा होता. त्यामुळे मानवी कल्याणाचा हा उदात्त हेतू डोळ्यासमोर होता. मानवी जीवनाचा आणि कल्याणाचा अविभाज्य भाग म्हणून महाराजांनी धर्माला मान्यता दिली आहे. पण महाराजांनी धर्माच्या आधारे होणारे शोषण याच्या विरोधामध्ये आक्रमक भूमिका

घेऊन धर्माच्या आधारे अशा विसंगत व्यवहार करणाऱ्या राजकीय पुढाऱ्याला आणि पुरोहिताच्या हितसंबंधाला कडाडून विरोध केला आहे.

**3. युरोपातील प्रबोधन चळवळीचा महाराजांच्या धार्मिक विचारावर प्रभाव**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी युरोपातील प्रबोधन आणि पुनरुज्जीवन या दोन्ही ही धार्मिक सुधारण्याच्या टप्प्यातील महत्वाच्या घडामोडी अभ्यास केलेला होता. युरोपातील प्रबोधनाची आणि पुनरुज्जीवनाची चळवळ ही युरोपातील जन माणसासाठी अत्यंत महत्त्वाची होती. धर्माचे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांमध्ये अस्तित्वात असलेल्या क्षेत्राचे स्वरूप अत्यंत शोषणकारी होते. धर्मामुळे मानवी जीवन दुःख आणि वेदनादायी बनलेले होते. मध्ययुगीन काळातील म्हणजे प्रबोधन पूर्व काळातील चर्च आणि राज्यसंस्था यांच्या संयुक्त युतीमुळे जन्म माणसाचे जीवन अत्यंत अमानवीय बनले होते. धर्माच्या आधारे चर्चा आणि राजा लोकांना चुकीच्या संकल्पना व धर्माचा आधारे शोषण केले जात होते. म्हणून युरोपमध्ये प्रबोधनाची आणि पुनरुज्जीवनाची चळवळ ही मोठ्या प्रमाणात धर्म आणि राज्यसंस्थेच्या विभक्तीकरण आला आणि धर्माचा मानवी आशय प्राप्त करून देण्याचे महत्त्वाचे योगदान दिले. म्हणून महाराज म्हणतात की " युरोपात जेव्हा विद्येचे पुनरुज्जीवन{ रिव्हायवल ऑफ लर्निंग ] झाले. तेव्हा सर्व लोक समाजाची सुधारणा झाली. आणि त्याच्यासोबत धार्मिक सुधारणा घडून आल्या. धर्मग्रंथातून केलेली विधाने शास्त्रीय शोधाच्या कसोटीवर लोक घासून पाहून विचार करू लागले तसेच धर्माने घालून दिलेल्या विविध समारंभाचा मूळ हेतू काय असावा याचाही ही लोकांनी धडा घालू लागले लोकांच्या धार्मिक गरजा अशा रीतीने वाढू लागल्यामुळे त्यांचे धर्मगुरू अर्थात सुशिक्षित आणि विवेकी असणे अपरिहार्य होऊन बसले"

**4. धर्म चिकित्सा आणि धर्मसुधारणा**

सयाजीराव गायकवाड यांनी धार्मिक सुधारणा आणि धार्मिक चिकित्सा हे मानवी जीवनाच्या अपरिहार्य भाग म्हणून केल्या पाहिजे अशी त्यांची धारणा होती. धर्माची निर्मिती आणि धर्माचा नीतिनियम हा काळानुरूप बदलायला हवा त्यामध्ये बदल झाला नाही तर मोठ्या प्रमाणात कर्मकांड आणि अंधश्रद्धेला खतपाणी मिळते. अशी महाराजांची भूमिका होती. म्हणून महाराज म्हणतात की "आमच्या धर्म क्रिया पुष्कळ विधी अशी आहेत की एकेकाळी ते किती उपयुक्त व महत्त्वाचे असले तरी आज त्यांच्यात काही करू शकणार नाही .प्रामाणिकपणा व सत्यवादिता तुमच्या तंगी हवे असे मी नुकतेच सांगितले .त्या गुणांचा अंगीकार करावा तुम्ही बुद्धीला न पटणारी व प्रतिगामी वाटणारी काही धर्म मते व धर्म व धर्माचार बदलून घ्यायला हवेत व काही तर अजिबात टाकून द्यायला हवेत. धर्मविचाराचा आधुनिक प्रवाह कोणत्या दिशेने वाहत आहे .जगात श्रेष्ठ ठरण्याचा विचारवंताचे धर्मविचार कोणत्या प्रकारचे आहेत हे नीट पाहूनच तुम्ही आपल्या आचार विचारात बदल किंवा क्रांती करावयास हवी. ती न केली तर लोकांची धर्मश्रद्धा शितल होते. अधर्मआचरण कडे लोकांची प्रवृत्ती होत जाते. प्रमाणबद्ध ते शिवाय सौंदर्य कशाचे? अति तिथे माती

ठरलेलीच कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करू नये. विधी नियम रूढी आचार याचा जर लोकांना असह्य त्रास झाला तर त्याच लोकांनी केलेल्या प्रतिकारही तितकाच असह्य होत असतो". यावरून लक्षात येते की धर्माचा असे आणि धर्माची नीतिनियम याची चिकित्सा करून काळानुरूप धर्माचा मानवी असे अधिकाअधिक समाजाभिमुख व समाजाच्या व्यवहाराची सुसंगत व्हावा यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात भर दिल्याचे दिसते. धार्मिक सुधारणा हासुद्धा प्रत्येक समाजाच्या आणि राष्ट्राच्या पाया आहे. धार्मिक क्षेत्रांमध्ये सुधारणा झाला तरच त्या राष्ट्राची प्रगती किंबहुना समाजाची प्रगती होत असते. अन्यथा तो समाज पुढे जाऊ शकत नाही. म्हणून महाराज म्हणतात की "परिस्थितीनुसार धार्मिक व सामाजिक चाली हळूहळू बदलत जाव्या हे साहजिक आहे प्रत्येक राष्ट्रात हे अवस्थांतर होतच असते किंबहुना असे अवस्थांतर होणे हे राष्ट्राच्या जिवंतपणाचे लक्षण आहे असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही कोणती वस्तू जिवंत राहते ती अविरत कार्य व कार्यांत किंवा अवस्थांत या यांच्यामुळेच ना म्हणून या दहा मिनिट व सामाजिक बाबतीत देशाची सद्यस्थिती काय व ती कशी असायला हवे याचा विचार के धर्मगुरूंनी केला पाहिजे"

**5. धर्मगुरूचा भूमिका आणि कार्य**

युरोपमध्ये धर्मगुरू म्हणजे देव आणि माणसांमधील प्रतिनिधित्व करणारा दुवा अशा प्रकारची मानसिकता होती. मध्ययुगीन काळामध्ये देवाचा प्रतिनिधी म्हणून धर्मगुरूकडे पाहिले जात होते. धर्मगुरूंनी सुद्धा आपले भूमिकासुद्धा जन माणसांमध्ये मी येशूचा प्रतिनिधी आहे. यात तत्वावर सांगितली होती. त्यामुळे लोकांनी आंधळेपणाने धर्मगुरूंनी सांगितलेल्या धर्माचा अन्वयार्थ स्वीकारत असत आणि त्यानुसार त्याचा अंगीकार करीत असत. धर्मगुरू हा धर्माच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात लोकांची आर्थिक आणि धार्मिक शोषण करत होता. देवाच्या नावाने विविध कर्मकांड व अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यात धर्मगुरूचा महत्त्वाचा पुढाकार होता. धर्मगुरू राजकीय आश्रय असल्यामुळे तो मुक्तपणे अशा प्रकारचे कृत्य करत होता. याला पहिल्यांदा जर विरोध केला असेल तर ती म्हणजे धर्मसुधारणेची प्रबोधनाचे आणि पुनरुज्जीवनाची चळवळ यातूनच धर्माचा मानवी चेहरा आणि धार्मिक कार्यक्षेत्र हेसुद्धा निश्चित केले. भारतामध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात धार्मिक क्षेत्रामध्ये अशाच प्रकारचा व्यवहार केला जात असे. त्यामुळे महाराजांनी धर्मगुरू च्या बाबतीत कोणते गुण अंगी करावे आणि धार्मिक क्षेत्रामध्ये कशा प्रकारचा व्यवहार करावा याबाबत म्हणतात की "धर्मगुरूच्या आंगिक मुख्यता कोणते सद्गुना अस्तित्वात असावेत हे थोडक्यात सांगणे जरुरी आहे ते सद्गुणाचे की शुद्ध भाव प्रामाणिकता सत्यवादी परोपकार कृती निर्मळपणा आणि प्रासंगिता धर्मगुरूंनी कोणत्याही प्रकारचा विकार मानणे व कोणालाही अजिबात टाकून बोलून सर्व लोकांना मिळून-मिसळून राहावे. दुष्टांना सत कृती करण्यास प्रवृत्त करावे दुःखी त्यांना सुखी करावे आणि सर्वांना उच्चतम कल्याणाचा मार्ग एकूणच धर्मगुरूंची सुद्धा भूमिका महाराजांनी मानवी कल्याणासाठी आणि दुर्गुणांचा नाश करून सद्गुणांच्या

प्रचार आणि प्रसार करण्यासंबंधीची भूमिका विशद केली होती". या भूमिकेच्या आधारित महाराजांनी मोठ्या प्रमाणात बडोदा संस्थानामध्ये धार्मिक क्षेत्रात सुधारणा केलेल्या होत्या.

**6. शिकागो मधील दुसऱ्या सर्वधर्म परिषदेचे नेतृत्व {1933)**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिकागोमधील दुसऱ्या सर्वधर्मीय परिषदेचे नेतृत्व केले. भारतामध्ये स्वामी विवेकानंद यांनी शिकागोमधील सर्वधर्मीय परिषदेचे नेतृत्व केल्याचे आपणा सर्वांना परिचित आहे. किंबहुना भारतीय जनमानसावर त्या भाषणाच्या आशय याचा प्रभाव मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचला आहे. सयाजीराव गायकवाड यांनी 1933 ला शिकागो येथील दुसऱ्या धर्म सर्वधर्मपरिषदेत नेतृत्व केल्यामुळे मोठ्या प्रमाणात त्यांनी धर्माची उदय विकास आणि मानवी जीवनामध्ये धर्माचे स्थान यासारख्या महत्त्वाच्या विषयाला हात घालून धार्मिक तत्त्वमीमांसा मोठ्या प्रमाणात विकसित करण्यात त्यांचे योगदान आहे. या परिषदेमध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्या मांडणीत धर्म आणि धर्माचे विविध पैलू उलगडून दाखवले गेले. भारतीय जनमानसामध्ये धर्म नावाच्या संकल्पनेचा वेध घेऊन धर्माला मानवी जीवनाचा असे प्राप्त करून देण्यात महाराजांनी महत्त्वाची भूमिका मांडली. या भाषणाचे काही ऐतिहासिक महत्त्व म्हणजे स्वामी विवेकानंद बरोबरीचे किंबहुना त्यांच्या तोडीचे भाषण म्हणून त्याचा प्रभाव आणि त्याचे ऐतिहासिक महत्त्व राहिले आहे. धर्माचा धर्माचा मानवी असे आणि त्याची मानवी गरजेतून झालेली उत्पत्ती यासारख्या महत्त्वाच्या विषयाला हात घालून त्यासोबत त्यांनी धर्माचा सेवाभावी मानवी मूल्य म्हणून या परिषदेतील भाषणात भूमिका स्पष्ट केली. शिकागो येथील भाषणात महागात सयाजीराव गायकवाड म्हणतात की "स्फूर्ती व ज्ञान प्राप्त होण्यासाठी त्याला धर्माची जरुरी आहे पण जर या कामी मी त्याला धर्मामुळे अडचण नको तर त्या धर्माचीच पुनर्घटना झाली पाहिजे". यातून महाराजांची धर्माबद्दलची समज व धर्माचा मानवी जीवनातील असे कशा प्रकारे अभिव्यक्त होता याचा अभ्यास स्पष्ट होतो.

**• विधवा पुनर्विवाह (1902)**

महाराज सयाजीराव गायकवाड हे प्रामुख्याने स्त्रियांच्या सुधारणांचे जनक होते. हिंदू धर्माच्या नावाखाली अनेक मोठ्या प्रमाणात स्त्रियांवर अत्याचार व बंधनी मोठ्या प्रमाणात टाकली जात होते. हिंदू धर्माच्या नावाखाली जातीव्यवस्था आणि पितृसत्ताक समाज स्त्री यावर मोठ्या प्रमाणात अन्याय आणि अत्याचार याला सामोरे जावे लागत होते. संपत्ती आणि सत्तेचे सर्व अधिकारी स्त्री यावर नियंत्रणासाठी होते . म्हणून हे बदलण्यासाठी महाराजांनी मोठ्या प्रमाणात सामाजिक सुधारणा घडून स्त्री सुधारण्याच्या कायद्याची अंमलबजावणी केली.

भारतामध्ये किंबहुना बडोदा संस्थान मध्ये मोठ्या प्रमाणात बालविवाहाची समस्या निर्माण झाली होती. बालविवाह मध्ये पुनर्विवाह ची मान्यता हिंदू धर्म आणि परंपरेनुसार अमान्य होती. त्यामुळे

समाजातल्या अनेक महिलांचा सामाजिक आर्थिक आणि शारीरिक अत्याचाराला सामोरे जावे लागत होते. म्हणून महाराजांनी विधवा पुनर्विवाह कायदा करून बडोदा संस्थानांमध्ये स्त्रियांच्या मुक्तीची मोठी प्रमाणात चालना देण्यात आली. विधवा विवाह कायदा केल्यामुळे समाजामध्ये स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेला मोठ्या प्रमाणात गतिमानता प्राप्त झाली. विधवा असल्याचा समाजातील अनेक पुरुषांनी आपले अनैतिक संबंध प्रस्थापित करणाऱ्याला प्रतिबंध घालण्यात आला. त्यासोबतच समाजातल्या अनेक नवीन नियमांची व स्त्रियांच्या सन्मान प्राप्त करून देण्यासाठी च्या नियमन प्रस्थापित झाले.

**7. धर्म स्वातंत्र्याचा कायदा (1902)**

सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानामध्ये धर्मस्वातंत्र्य बदलण्याचा स्वतंत्र कायदा केला. आपल्या संस्थानमध्ये कोणत्याही व्यक्तीला आपल्या धर्माच्या बाबतीत चिकिस्तक वतीने राहण्याचा आणि त्याचे पालन करण्याचा अधिकार असला पाहिजे. धर्म हा व्यक्तीच्या नैतिक उन्नती साठी महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. पण भारतातील किंबहुना बडोदा संस्थानातील सामाजिक जीवनामध्ये धर्माने नेहमी व्यक्तीला बंदिस्त करून त्याचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा नाकारली आहे. धर्माचे नियम आणि कायदे काढून अतिशय कठोर व अमानवीय होते. ही भूमिका सयाजीराव गायकवाड यांच्या वैशाली भूमिकेशी विसंगत होती. म्हणून महाराजांनी 1902 मध्ये बडोदा संस्थानात धर्म स्वातंत्र्याचा कायदा करून धर्माच्या आशय आणि व्यवहाराला पुनर्मांडणी करून प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माच्या आधारे जगता येते किंवा तो धर्म बदलण्याचं स्वातंत्र्य या कायद्यानुसार प्राप्त झाले. या कायद्याअंतर्गत महत्त्वाची तरतूद म्हणजे कोणत्याही व्यक्तीला धर्म बदलल्यानंतर आपला संपत्तीवर हक्क किंवा इतर कोणतेही कायदेशीर हक्क गमवता येणार नाहीत ही भूमिका त्यामध्ये महत्वाची होती. सयाजीराव गायकवाड यांनी व्यक्तीच्या भौतिकीत संबंध आणि कायदेशीर हक्काला न डावलता त्याचे सर्व हक्क व संपत्तीचा हक्क अबाधित ठेवून धर्मस्वातंत्र्य किंवा धर्म बदलण्याची स्वातंत्र्य देण्यात आले. हा कायदा अत्यंत महत्वाचा होता. याचे कारण ख्रिश्चन मिशनरी किंवा इस्लाम धर्माच्या प्रसार प्रचार यामुळे त्यावर प्रतिक्रिया वादी गट याने अतिशय आक्रमकपणे विरोध केलेला होता. महाराजांनी अशा कोणत्याही विरोधाला न जुमानता प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्याचा हक्क देण्याची महत्त्वाची भूमिका त्यामध्ये घेतली.

**8. बालविवाह प्रतिबंध कायदा (1904):**

भारतीय समाज हा जाती-धर्माच्या वर्चस्व आणि शोषणाच्या दमन करून प्रस्थापित झाला आहे. भारतातील जातीव्यवस्थेचा तात्विक आधार हा धर्म आहे. हजारो वर्ष भारतातील ब्राह्मणी धर्म ग्रंथ दलित बहुजन समाजाला शिक्षण आणि ज्ञानापासून वंचित ठेवले आहे. ब्राह्मणी धर्म वर्चस्वाच्या आणखीन एक आधार हा पितृसत्ताक व्यवस्थाही होती. पितृसत्ताक समाज व्यवस्थेने भारतीय समाजाला हजारो भविष्य दमन करून स्त्रियांना शोषणाच्या श्रंखला मध्ये बंदिस्त केलेला होता. भारतीय समाजात हजारो वर्षापासून

जातिव्यवस्था धर्मव्यवस्था आणि पितृसत्ताक संस्थांच्या माध्यमातून शारीरिक मानसिक आणि आर्थिक शोषण केले जात होते. ब्राह्मणी धर्मव्यवस्थेने उपवास आणि कर्मकांडांमध्ये महिलांना सक्रिय करून त्यांचे शारीरिक शोषण आणि मानसिक गुलामगिरी प्रस्थापित करण्यात यशस्वी झाली होती. सतीप्रथा, बालविवाह, किंवा संपत्ती पासून बेदखल करण्यासारखे अनेक नियम धर्मशास्त्राच्या नियमाने चालत होते. बालविवाह हा सुद्धा याच धर्मशास्त्राच्या नियमांच्या आधारे निर्धारित केला जात होता. मुलगी यांचा कोणताही शारीरिक मानसिक आणि बौद्धिक विकास न पाहता भारतीय समाजामध्ये विवाह करून दिले जात होते. मुलगी किंवा महिला यांच्यावर ती बालविवाहामुळे खूप मोठ्या प्रमाणात शारीरिक आणि बौद्धिक क्षमता नसताना सुद्धा लग्न किंवा विवाह करून दिल्यामुळे अचानक पणे मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत होते. वयात न येता सुद्धा प्रजोत्पादन यासारख्या घटकांना सामोरे जाऊन अचानक पणे मृत्युमुखी किंवा शारीरिक हानी सहन करावे लागत होते. अवेळी आलेले वैद्य त्व किंवा विधवा पण अशा अनेक संकटातून भारतीय महिला जात होती. सयाजी महाराज यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा 1904 मध्ये केला. देशाच्या इतिहासामध्ये बालविवाह प्रतिबंध कायदा करणारा हा पहिला राजा होता. या कायद्याच्या प्रस्तावनेमध्ये “पुढच्या पिढीचे आरोग्य आणि जीवनमान दीर्घायुष्य वाढवण्यासाठी त्यांची शारीरिक सक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने जन्म तयार करण्याकरता बालविवाह प्रतिबंध करणे तातडीचे आहे”. बालविवाह करणाऱ्या किंवा बालविवाह करण्यासाठी सक्ती करणाऱ्या अनेक घटकांना कायदेशीर शिक्षेची सुद्धा तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आलीया. कायद्यामध्ये प्रामुख्याने तीन तत्त्वाचा समावेश करण्यात आला होता

1. अज्ञानाचा विवाह साठी हा कायदा शिक्षेची तरतूद करतो व अज्ञान व्यक्ती म्हणजेच अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या पुरुष /मुलगा किंवा 16 वर्षांपेक्षा कमी वयाची स्त्री/ मुलगी

2 . आठ वर्षे वयाखालील अज्ञानाचा विवाह हा कायदा अवैद्य ठरवतो

1. शिक्षेसंदर्भात स्पष्ट फरक केलेला आहे आठ वर्षाखालील अज्ञानाच्या लग्नासाठी एक महिन्यापर्यंत साधी कैद किंवा पाचशे रुपये दंड किंवा दोन्हीही शिक्षा आणि अज्ञानाच्या विवाहासाठी केवळ दंडाची तरतूद. बालविवाह मुलगा सोळा  वर्षापेक्षा लहान व मुलगी 12 वर्षांची लहान असेल तर त्यांना कायदेशीर तरतूद करण्यात आली. या कायद्यामध्ये विवाहाचे वय निश्चित करण्यात आले. मुलांनी आपले सोळा वर्षे पूर्ण केले असले पाहिजे आणि मुलींनी आपले वर्ष बारावी वर्ष पूर्ण केले असले पाहिजे अशा प्रकारची या कायद्यामध्ये तरतूद करून बडोदा संस्थानांमध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा लागू केला.बालविवाह प्रतिबंध कायद्यामुळे अनेक महिला मुली शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यास सुरुवात झाली. बालविवाह प्रतिबंध कायद्यामुळे मुलांची आणि मुलींची शारीरिक बौद्धिक वाढ होऊन प्रगल्भ नाते व परस्पर विचार विनिमय निर्माण होण्यास मदत झाली.

**9. लग्नातील उधळपट्टी व खर्चाला विरोध**

महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदा संस्थानात मोठ्या प्रमाणात लग्नावर होणारा खर्च मोठ्या प्रमाणात होत असे. लग्नातील होणारी ही उधळपट्टी वेळप्रसंगी कर्ज काढून केली जात असेल. लग्नात होणारा खर्च हा प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात सामाजिक प्रतिष्ठा आणि विवाह संस्थेचे दर्जा कायम ठेवण्यासाठी प्रयत्न केला जात असे. लग्नातील या उधळपट्टीला महाराज सयाजीराव गायकवाड यांनी कडाडून विरोध केला आहे. महाराज सयाजीराव गायकवाड म्हणतात की "प्राचीन काळापासून लग्न हा संस्कार करताना आपण काही विधी पाळत असतो ते पाळण्याचा आपला हेतू लग्नसंस्थेचे महत्त्व जबाबदारी लोकांना विशेषतः वधूवरांना कळावे, वडीला विषयी आदर भाव एकनिष्ठतेचे औचित्य व संततीचे संरक्षण या गोष्टी लोकांच्या मनात हव्यात हा आपला उद्देश असतो परंतु हा हेतू पार पाडणारे विधी सध्याच्या युवा पद्धत किती आहेत या हेतूला हरताळ फासणारे विधी किती आहेत आणि निरर्थक विधी किती आहेत याचा विचार करा लग्नप्रसंगी होणारी भोजने वरात इत्यादीसाठी लोकच काढत असतात हे सर्वांना ठाऊक आहे कर्ज घेणाऱ्या माणसाला माणसाला काय हाल व कितीला चाळीस सोसावी लागते ही सर्वांना ठाऊक आहे धर्मगुरूंनी याबाबतीत लक्ष घालून काही महत्त्वाचे काम करणे आवश्यक आहे लग्नातील भोजनाचा अफाट खर्च त्यांना सहज कमी करता येईल कोणताही खर्च कशासाठी करायचा त्याचा हेतू काय हे त्यांनी लोकांना समजून सांगावे आधी केल्याने हेतु अधिक साधी होतो व अधिक पुण्य लाभते अशी स्थिती नसते". (भाषण संग्रह भाग 2 पान 12) यावरून लक्षात येते की महाराजांनी लग्नांमध्ये होणारा मोठ्या प्रमाणातील खर्च हा किती निरर्थक व उधळपट्टी करणार आहे. लग्नातील खर्च हा केवळ आणि केवळ सावकारांच्या हितासाठी या पलीकडचा दुसरा हेतू सद्यस्थितीत तरी साध्य होत नाही त्यामुळे धर्मगुरू व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती यांनी या खर्चाला कडाडून विरोध केला पाहिजे ही त्यामागची भूमिका आहे.

**10. घटस्फोटाचा कायदा:**

बडोदा संस्थानामध्ये किंबहुना भारतामध्ये विवाह संस्था आहे अत्यंत पितृसत्ताक व ब्राह्मणी आहे. विवाह संस्थेचा मूळ आधार जातीव्यवस्थेची पुरुषी हितसंबंध हे आहे. विवाह संस्थेमुळे जातीव्यवस्था मजबूत होण्यास खूप मोठ्या प्रमाणात मदत झाली. एका बाजूला विवाहसंस्था ही स्त्रियांच्या प्रजोत्पादनाची नियंत्रण प्रस्थापित करते आणि त्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करत. विवाह संस्थेला एका बाजूला जातीअंतर्गत करून जात ही एक बंदिस्त होण्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. जातीअंतर्गत विवाह हा विवाहसंस्थेचा घटक असल्यामुळे त्यात ही पवित्र अपवित्र यामुळे पितृसत्ताक हितसंबंध सुद्धा कायम ठेवले गेले. हिंदू विवाह पद्धतीनुसार लग्न किंवा विवाह हे सात जन्माचे नाते आहे त्यापासून पुरुषांना दुसरा विवाह करण्याची परवानगी दिली गेली आहे पण स्त्रियांना त्यांच्या योनीशुचिता वरती वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी ब्राह्मणी

पुरुषसत्ताक व्यवस्थेने त्यांना मोठ्या प्रमाणात शोषणाला बळी जावे लागते. सती प्रथा ही विवाह संस्थेच्या अंतर्गतच स्त्रियांच्या गुलामगिरीचा महत्त्वाची भूमिका पार पाडणारे विधी होतात. अशा अनेक तत्वाची चर्चा केली गेली पाहिजे पण तो आपला विषय नाही.

म्हणून सयाजीराव गायकवाड हे प्रागतिक विचारांची महाराजा होते. त्यांचा प्रागतिक विचार हा पुरुषकेंद्री नव्हता. तर त्यामध्ये स्त्रियांच्या मुक्तीचा आशय सुद्धा होता म्हणून महाराजांनी स्त्रियांनासुद्धा घटस्फोट घेण्याचा महत्त्वाची तरतूद त्या काळामध्ये बडोदा संस्थानात केलेले होते हा कायदा अतिशय महत्त्वाचा आणि स्त्रियांच्या सन्मान वाढवणारा होता या कायद्यामध्ये हिंदू पत्नी तीन मुद्द्याच्या आधारे घटस्फोट घेऊ शकते अशी तरतूद करण्यात आली होती.1. पतीची नपुसकता 2. त्याचे मनोदौर्बल्य किंवा मनोविकार. तो जखमा यासारख्या दुर्गंधीयुक्त कुष्ठरोगाने पिडीत असेल तर, या तीन तत्वाच्या आधारे त्या स्त्रीने घटस्फोट घेऊ शकते ही त्यामागची धारणा निश्चित झाली. या कायद्याअंतर्गत महिलांना आपल्या वैवाहिक जीवनामध्ये संधी उपलब्ध करून देण्याची आणि स्वातंत्र्य मिळवून देण्याची महत्त्वाची भूमिका पार पडते. या कायद्यामुळे एका बाजूला विवाह अंतर्गत लोकशाही मुल्य व सन्मान प्राप्त झाला. नात्यातील प्रगल्भता आणि विचाराची देवाणघेवाण निर्माण होण्यात या कायद्याने महत्त्वाचा हातभार लावला.

त्यानंतर महाराजांनी या कायद्याअंतर्गत अनेक महत्त्वाच्या तरतुदींचा उल्लेख केला यामुळे विवाहाच्या नात्यातील म्हणजेच पत्नीला खूप मोठे अधिकार प्राप्त झाले. त्यातील सात वर्ष पतीचा ठावठिकाणा नसणे, सन्यास घेणे, आणि धर्म स्वीकारणे, क्रूरपणाचापणाचा पुरावा, कोणत्याही योग्य संयुक्तिक कारणाशिवाय एकाने दुसऱ्याला लग्नानंतर तीन वर्षांपेक्षा अधिक काळापर्यंत सोडून देणे सोडणे, तीन वर्षापेक्षा अधिक काळ अमली पदार्थाचे सेवन वेसन असणे आणि वैवाहिक जबाबदारी पार न पडणे, व्यभिचार कर तत्त्वाचा समावेश करण्यात आला. यामुळे स्त्री ही खूप मोठ्या प्रमाणात मुक्त झाली. यातील तरतुदी फक्त पत्नीलाच लागू होते असे नाही पतीसाठी सुद्धा घटस्फोट घेण्यासाठी महत्त्वाच्या तरतुदींचा उल्लेख या ठिकाणी केला. पत्नी लग्नाच्या वेळी पती सोडून अनेक कुणावर व मुळे असेल आणि पतीला हे माहीत नसेल त्यावेळीस पती हा घटस्फोट घेऊ शकतो. दुसरे तत्त्व म्हणजे पती हयात असताना पत्नीने दुसरे लग्न केले तर पती हा दुसरे लग्न करू शकतो या दोन तरतुदीचा समावेश त्यामध्ये करण्यात आला.

**11. पुरोहितांना परवाना:**

हिंदू धर्मशास्त्रानुसार हिंदू कर्मकांडाचे उत्सव करायचे असेल आणि साजरा करायचे असेल तर पुरोहिताच्या अत्यंत गरज आहे अशी भूमिका घेऊन वेगवेगळ्या राज्यांमध्ये पुरोहितशाही याला कायदेशीर मान्यता होती. पुरोहित शाहीचे महत्त्वाचे आधार आहे भारतातील जाती व्यवस्था होते. जातिव्यवस्थेने ब्राह्मणी वर्चस्व कायम ठेवण्यासाठी ब्राह्मण जातीतील पूर्वी तयार करून सर्वसामान्य लोकांचे विशेषता शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जात होते. पुरोहितशाही ही एका प्रकारे शोषणाची आणि

शासनाची महत्त्वाची संस्था होती. जाती व्यवस्था कायम ठेवावे आणि त्याचे भौतिक आधार कायम ठेवण्यासाठी पुरोहितशाहीच्या माध्यमातून सांस्कृतिक प्रभुत्व निर्माण केले जात होते. या सर्व पुरोहित शाहीला महत्त्वाचे आव्हान निर्माण करण्यात महात्मा फुलेंचे महत्वाचे योगदान होतं. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांचा आसूड आणि गुलामगिरी या ग्रंथातून पुरोहितशाहीच्या वर्चस्वाविरुद्ध आणि शेतकऱ्यांच्या त्याबद्दल अत्यंत आक्रमक पद्धतीने हल्ला चढवून पुरोहितशाही नष्ट करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. सयाजीराव गायकवाडांनी सुद्धा बडोदा का ज्या मध्ये पुरोहित शाही याला पारंपारिक कोणताही आधार न देता हिंदू धर्माच्या कर्मकांड रीतिरिवाज व सांस्कृतिक उत्सव करायचे असेल तर पुरोहित शाही असली पाहिजे पण ती पुरोहितशाही जातीवर आधारित न जाता त्याचा आधार हा आधुनिक परीक्षेच्या माध्यमातून पास होऊन पुरोहितशाही नेमण्यात महत्त्वाचा भूमिका घेतली.

या कायद्यामुळे पुरोहितशाही ला कायदेशीर मान्यता भेटली पण त्यासोबतच महाराजांनी नेमलेल्या परीक्षा पद्धत आणि परवाना मुळे पुरोहित शाही मध्ये इतर जातीचे प्रतिनिधीसुद्धा त्यामध्ये समावेश झाला म्हणजेच ब्राह्मणेतर जातींना सुद्धा हिंदु धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे करण्याचा आणि सण उत्सव साजरा महत्त्वाचा हक्क या कायद्यामुळे मिळवून दिला. सयाजीराव गायकवाड यांना एक बाब लक्षात आली होती की बडोदा राज्यामध्ये पुरोहित यांनी कधीही दलित आणि अस्पृश्य समाजात कर्मकांड करण्यास व सांस्कृतिक उत्सव करण्यास नकार दिलेला होता त्यामुळे अस्पृश्य समाजामध्ये एक प्रकारची सांस्कृतिक दारिद्य निर्माण झालेले होते. पुरोहितांना पारंपारिक हिंदू धर्माच्या नियमानुसार जे अधिकार आहेत ते अधिकार या परवान्यानुसार सर्वांना प्राप्त झाले आणि सांस्कृतिक दृष्ट्या दलित आणि अस्पृश्य समाज जो पोरका झालेला होता त्याला सांस्कृतिक अधिकार देण्यात या कायद्याने महत्त्वाचा हातभार लावला. महाराजांनी हा कायदा करून एका प्रकारे पारंपारिक पुरोहित शाहीला नष्ट करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. धार्मिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करणे सर्वांना धर्माच्या क्षेत्रात हस्तक्षेप करण्यात या कायद्याने महत्त्वाचे सुधारणा केली.

- **समारोप**

सयाजीराव गायकवाड हे प्रागतिक विचाराचे समाज सुधारक होते. समाजातल्या शोषित आणि वंचित घटक धार्मिक आणि जातीय व्यवस्थेच्या बंधनातून मुक्त झाला पाहिजे. आधुनिक शिक्षणाच्या प प्रवाहामध्ये सर्वांना सामावून घेतले ही त्यामागची भूमिका आहे. आज सुद्धा भारतामध्ये धर्माच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा, आणि कर्मकांड यांना प्रोत्साहन दिले. हजारो माणसे आपल्या जीवनामध्ये अंधश्रद्धेच्या नावाखाली जीव घेतला जातो. या सर्व पार्श्वभूमी व धार्मिक आणि सामाजिक कर्मकांडात सर्वसामान्य जनता मुक्त झाली पाहिजे. ती महाराजाचे व्यापक भूमिका होती. राज्य संस्था आणि धर्म संस्था आपल्या विभक्त

करून धर्मनिरपेक्ष या आधुनिक आणि भौतिक वादी मूल्यांना प्रोत्साहन देण्याची गरज महाराजांच्या विचारातून दिसतो.

## संदर्भसूची

*महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषः संपादक बाबा भांड, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*

*सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड 1 शिक्षण धर्म आणि तत्वज्ञान, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*

*सृष्टीची सेवा, ईश्वराची मैत्री, धर्म विषयक विचार, सयाजीराव गायकवाड,संपादक बाबा भांड ,उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन , प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*

*सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड 3 राज्य प्रशासन, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*

*सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड 4, शेती, पाणी आणि उद्योग, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*